# ''शिकण्यासाठी कमवा''

## आदर्श शिक्षण मंडळीचा एक अभिनव यशस्वी उपक्रम



## 'आदर्श गर्ल्स हायस्कूल' मधील २१मुलींनी मिळविली स्वकष्टार्जित कमाई

आदर्श शिक्षण मंडळीच्या नातूबाग परिसरातील, आदर्श विद्यालय मुलींच्या शाळेत जुलै २००८ मध्ये 'इलेक्ट्रॉनिक्स' या विषयाचे व्यावसायिक प्रशिक्षण सुरू करण्यात आले. संस्थेचे माजी विद्यार्थी श्री. सुनील घुले यांनी इयत्ता आठवी व नववीतील मिळून एकूण एकशे अठ्ठावीस विद्यार्थिनींना इलेक्ट्रॉनिक्सचे प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली. प्रॅक्टिकल अनुभवासाठी शाळेतच सर्व उपकरणांनी सुसज्ज् अशी इलेक्ट्रॉनिक्स ची प्रयोगशाळा आदर्श शिक्षण मंडळीतर्फे उभारण्यात आली. विद्यार्थिनी सोल्डरींग कसे करावे, वायर्स कशा जोडाव्यात हे शिकू लागल्या व त्यांना या विषयाची गोडी वाटू लागली.

एकूण विद्यार्थिनींमधून एकवीस मुलींची प्रातिनिधिक स्वरूपात निवड करण्यात आली. या मुलींना घुले इंडस्ट्रीज् तर्फे 'तापमान नियंत्रक' बनविण्याचे पहिले काम मिळाले. व हे काम मुलींनी दिलेल्या वेळेत यशस्वीरीत्या पार पाडले. त्यांना या कामाचे मानधन मिळाले.

27 एप्रिल '09' ला अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर ही मानधनाची रक्कम विद्यार्थिनींना सुपूर्त करण्यात आली.



या कार्यक्रमाला टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक प्रमुख पाहुणे व श्रीमती प्रेमाताई तपस्वी अध्यक्षा होत्या. विद्यार्थिनी मिळालेल्या स्वकष्टर्जित कमाईमुळे आनंदित होत्या व आपणही आता आई वडिलांना स्वत:च्या पुढील शिक्षणासाठी हातभार  लावू या आत्मविश्वासाने समाधानी होत्या. आदर्श शिक्षण मंडळीने सुरू केलेली 'शिकण्यासाठी कमवा' ही योजना मूर्त स्वरूपात आली, यापुढेही या विद्यार्थिनींना अशा प्रकारची कामे मिळतील.

## 'स्वकष्टार्जित कमाई' मिळालेल्या सर्व मुलींचे हार्दिक अभिनंदन!